नियमित फौजदारी खटला क्र.९९/२०२२
सरकार/जयंत
<u>नि.क्र.३४</u>

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची साक्ष</u>

<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>
नाव – देवानंद सदाशिवराव सोनोले
वय – ३० वर्ष
धंदा – शेती,
राहणार – मदना, ता. नरखेड जि. नागपूर

<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कु.एस.एस.गांगावणे यांच्या मार्फत.</u>

१. मी आरोपींना ओळखतो. घटना हि दि. २१.०५.२०२२ रोजी मदना गावातील बस स्टॉप जवळील पानटपरीवर सकाळी ९ ते १० वाजताच्या दरम्यान घडली होती.

२. घटनेच्यावेळी मी घटनास्थळावरील आरोपी क्र. २ च्या पानटपरी जवळील सिमेंटच्या पाईपवर बसलो होतो. त्यावेळी आरोपी क्र.१ जयंत गायकवाड हा बस स्टॉपवर गेला होता. तेव्हा मी आरोपी क्र.२ सुरेंद्र गायकवाडला म्हटले की, जयंत गायकवाड तुझा भाउ आहे, तो इकडे तिकडे फिरतो, तु त्यालापण पानठेल्यावर का ठेवत नाही. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ चा आतेभाउ आरोपी क्र.३ युवराज सरदार पानठेल्यावर आला व त्याने खर्रा घोटण्याची लाकडी पाटी माझ्या डाव्या कानाजवळ मारली. आरोपी क्र.२ याने मला हाथा बुक्क्यानी मारहाण केली होती. त्यावेळी आरोपी क्र.१ घटनास्थळी आला होता. आरोपी क्र.३ ने बाजुला असलेल्या कुईटे यांच्या घरी जाउन एक लिंबाची काडी घेउन आला व त्याने काडीने माझ्या डोक्याच्या मागच्या बाजुने मारले. त्यामुळे माझ्या डोक्यातुन

रक्त निघत होते व मी खाली पडलो होतो. त्यावेळी गावातील प्रकाश बोरेकर हा तेथे आला व त्याने मला गाडीवर बसवून जलालखेडा पोलिस स्टेशन येथे घेउन गेला.

३. त्यानंतर पोलिस मला घेउन जलालखेडा प्राथमिक उपचार केंद्र येथे वैद्यकीय तपासणीसाठी घेउन गेले. त्यानंतर मी आरोपींविरुध्द पोलिस स्टेशन जलालखेडा येथे फिर्याद नोंदविली होती. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर फिर्यादला **नि.क्र.३५** देण्यात येते. आता मला छापिल प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. छापिल प्रथम खबर अहवालला **नि.क्र.३६** देण्यात येते.

४. घटनेच्या दोन ते तीन दिवसांनी पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते. मी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. मला आरोपींनी ज्या काडीने मारहाण केली ती काडी मला दाखविल्यास मी ती ओळखू शकतो. (न्यायालयात आज घटनेतील मुद्देमाल उपलब्ध नसल्यामूळे साक्षीदाराचा उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येते.)

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्विकृत** | **समक्ष** |
| **(पी.आर.पाटील)**<br>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**नरखेड** | **(पी.आर.पाटील)**<br>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**नरखेड** |

**दिनांक –२२.०१.२०२५**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**<u>लघुलेखकाचे नाव</u>**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)